# इंदिरा ते निर्भया

आपल्याच मातृभूमीत अनेक कर्तृत्ववान स्त्रिया होऊन गेल्या आहेत. उदाहरणार्थ पौराणिक काळातील गार्गी, मैत्रैयी सारख्या स्त्रियांपासून ऐतिहासिक काळातही राणी लक्ष्मीबाई, शिवाजी महाराजांना घडवणाऱ्या जिजाई, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे पर्यन्त. कितीतरी पुढार मतवादी, सुधारक, क्रांतिकारी विचारवंत स्त्रीयांमुळे भारताची प्रगती  ही सुकर बनली. ह्यामधील सुवर्णकाळ म्हणजे इंदिरा गांधी. पंडित जवाहरलाल नेहरू यांची एकुलती एक सुकन्या. त्यांच्या तालमीत लहानाची मोठी झालेली, विचारांचे स्वातंत्र्य जपणारी, अतिशय कणखर, निश्चयी.

भारतात सर्वोच्च पदावर विराजमान झालेली ही पहिली आणि एकमेव स्त्री इंदिरा ... आणि निर्भया सारखी स्त्री म्हणजे एक लाचार आणि निर्लज्ज समाजाचे जिवंत उदाहरण. खरच इंदिरा म्हटले की आठवते ती भारतील प्रगती तर दुसरीकडे निर्भया म्हटले की डोळ्यापुढे येते ती अधोगती. पण मला वाटते की अशा निर्भया सारख्या अनेक स्त्रिया असतील पडद्याआड, ज्या निमुटपणे आपले दुःख विसरून अजूनही अत्याचार सहन करीत आहेत. भारतासारख्या उच्चाविभूषित, सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या देशाच्या वाट्याला आलेली काळिमा फासणारी घटना निर्भायाच्या बाबतीत घडली.

जरा काही वर्ष मागे जाऊन पाहिलं तर याच नाण्याची दुसरी बाजूही पटते, एक विदारक सत्य. अगदी ऐतिहासिक काळातही अशी अनेक उदाहरणे पहावयास मिळतील, ऐकली असतील. पांडव काळात तर द्रौपदीला अनेक कटू प्रसंगांना सामोरे जावे लागले होते. तसेच श्रीकृष्णालाही १६००० स्त्रियांना वाचवण्यासाठी त्यांच्याशी विवाह करावा लागला होता. ह्या मागचे कारण म्हणजे त्या स्त्रियांची सुरक्षितता. विवाहित स्त्रीला जरतरी आदराने, मानाने वागवले जाईल म्हणून ... पण आजच्या काळात ही समीकरणे लागू पडत नाही बर का! हल्लीच्या काळात स्त्रियांचे वय, मान ह्या गोष्टी देखील क्षुल्लक ठरू लागल्या आहेत.रोजच्या जीवनातही स्त्रियांना अनेक गोष्टींना सामोरे जावे लागत आहे. अनेक राक्षसी नजरांना तोंड द्यावे लागत आहे. म्हणून तर मला वाटते की पूर्वी पण स्त्रियांना उपभोग्य वस्तू समजले जात असत, तसेच आतादेखील. कदाचित ह्या विषाची बीजें हि आधीच पेरली गेली, रुजली, त्याचे हे फळ "निर्भया" प्रकरण.

खोलवर विचार करता कधी कधी असे वाटते की भारतीयविवाह संस्था, पितृसत्ताक पद्धती, हुंडा पद्धती हेच तर यामागील भीषण सत्य नसेल! आजही कित्येक ठिकाणी, अनेक घरात मुलांना वरच्या दर्जाची, उच्च वागणूक दिली जाते. मुलींना कायमची खालच्या दर्जाची वागणूक मिळते. आजही "मुलगा" झाल्याचा आनंद जास्त, पण मुलीच्या जन्माचे स्वागत हे सुतकी चेहऱ्याने करतात. अर्थात त्या बाबतीत महाराष्ट्र मला जरा आधुनिक वाटला पण बाकी उर्वरित भारताबाबत न बोलणेच इष्ट ठरेल. आपण मुलींना जास्त संस्कार पद्धती शिकवतो; असे कर, तसे करून नको, सातच्या आत घरात; पण आता हेच सगळे संस्कारांचे अवमुल्यन होताना दिसत आहे. आता गरज आहे ती मुलीबरोबर मुलांनाही संस्काराचे धडे गिरवयची.

भारत आता जगात मानाचे स्थान मिळवत असताना, जगात अस्तित्व सिद्ध करताना, समाजाला  ह्या रानटी आणि क्रूर विचार पद्धतीच्या लोकांपासून परावृत्त करण्याची गरज आहे, हे "निर्भया" प्रकरणातून सिद्ध होते. "निर्भया" मुळे सर्वच स्तरामधून टीकेची झोड उठली आहे. भारताची सामाजिक प्रतिष्ठा अगदी धुळीला मिळाली आहे. मधे मी एका "सोशल साईट" वर वाचले कि एका उच्चशिक्षित मुलाला एका प्रख्यात युनिव्हार्सिटी मध्ये एका महिला प्रोफेसर कडे प्रवेश नाकारण्यात आला, कारण काय तर म्हणे तू एका "रेपिस्ट कंट्री" मधून आला आहेस, माझ्याकडे महिलांची संख्या जास्त आहे. हे जिवंत उदाहरण म्हणजे मुलांना ही काही अंशी या प्रक्षोभाला सामोरे जावे लागत आहे. भारताची प्रतिमा ह्यामुळे डागाळली गेली.

आज भारतात मुलींचा जन्मदर हा सरासरीपेक्षाही कमी झाला आहे. जन्माला येण्याच्याआधीच त्यांना मारून टाकले जाते. खरंतर हि परिस्थिती आताच जास्त दुखःद झाली आहे. बलात्कार हा फक्त स्त्रीवर नाही तर सगळ्या समाजावर होतो. हे सगळे पुरुष, राक्षसी विचारांची माणसे व्यभिचारी म्हणून स्त्रीलाच ठरवतात. काय चूक होती निर्भायाची, तिने कधी मोकळा श्वास घेऊच नये का? दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीत आजही स्त्री नाही हेच खरें. सामान्य स्त्रियांना देखील रोजच्या जीवनातही अनेक कसोटीचे क्षण येतात. आणि ह्या सगळ्यावर धाडसाने मात करत स्त्री आपली जवाबदारी पार पाडत असते. बलात्कार हा केवळ शारीरिक नसून तो कुठेतरी स्त्रीच्या मनावर खोलवर झालेला प्रचंड आघात असतो. प्रत्येक वेळी शारीरिक बलात्कारच होतो असे नाही, पुरुषी अहंकाराचे मुखवटे घातलेले चेहरे अनेकदा गलिच्छ, अर्वाच्य बोलूनही तेच साधतात. त्यांच्या विखारी नजराही हेच बोलतात.

आपण फक्त म्हणायचे कि खूप प्रगती झाली, सर्वच क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. स्त्री-पुरुष समान हक्क. अनेक स्त्रिया पुरुषांना लाजवतील अशी

कामगिरी करून दाखवतात. पण ह्या निर्भया प्रकरणामुळे खरं जागं केलंय, खरंच खरी पाहत झाली आहे का? की अजूनही आपण काळोखात वाट शोधत आहोत. कधी लख्ख सुर्याप्रकाश दिसेल? याचे उत्तर सापडतच नाही. मुलींना आपण अजूनही सांगतो कि लवकर घरी ये. उशीर करू नकोस. रात्री फार वेळ घराबाहेर नको. पण कधी-कधी वाटते कि हेच बरोबर आहे. त्यामुळेच निर्भायाबाबातीत किंवा इतरही मुलींच्याबाबतीत जे घडलं, ते झालंच नसतं. मुलींना अगदी कितीही सक्षम परिस्थितीविरुद्ध तोंड देण्यासाठी तयार केले तरी तिच्या सोबत कुणीही विश्वासार्ह मित्र, सोबती असला किंवा नवरा जरी असला काय? अशा परिस्थितीत दहा जणांसमोर काय ताकद आजमावणार, किती चातुर्य दाखवणार … खरेतर निर्भायासारखी वेळ अगदी कुणावर येवू नये अशीच प्रांजळ भावना. सगळ्या समाजाने, भारतीय जनतेने, अरे … तुम्ही अगदी देव बनू नका … पण तुमच्यातील माणूसपण तरी शाबूत ठेवा. सर्वांनी जरी माणुसकीने वागले तरी अशा अनेक निर्भया आपण वाचवू शकू. स्त्रियांच्या मनात पुन्हा एकदा आत्मविश्वास निर्माण करू शकू … तुम्ही हे करू शकता. स्त्री व पुरुष हे दोघेही समान निसर्गाने दिलेली देणगी आहेत. तेव्हा तिलाही समान जगण्याचा अधिकार आहे.

प्रत्येक काळ्या ढगाला एक चंदेरी किनार असते … या आशेवरच तू एक अबला नसून सबला आहेस. तेंव्हा कुठल्याही परिस्थितीत खचून न जाता त्याचा खंबीरपणे सामना कर. तू तुझे नवीन विश्व निर्माण कर. हाच संदेश नवीन उर्जा निर्माण करेल. निर्भायाला जर खरा न्याय मिळाला तर तीच तिला आदरांजली ठरेल. भारताला पुन्हा गरज आहे ती पुन्हा इंदिरा जिवंत करण्याची. तेव्हा पुन्हा इंदिराकडून निर्भायाकडे असा प्रवास न करता निर्भया ते इंदिरा; अशी जिद्द निर्माण करण्याची. आणि मला खात्री आहे हा आत्मविश्वास आपण भारतातील प्रत्येक स्त्रीला देवू शकू. अनेक इंदिरा घडू देत अशी मनःश्च प्रार्थना.


**सहभागी स्पर्धक**

**सौ. अनघा तुषार संत**

**मुळ:  पुणे**

**वास्तव्य: झिगन, जर्मनी**